REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 3 | DECEMBER - 2018

# डॉ. आंबेडकर यांचे ‘महार वतन’ विषयक विचार



**डॉ. संतोष अ. जेठीथोर**
**सहायक प्राध्यापक इतिहास विभाग , डी.आर.माने महाविद्यालय,कागल.**

## प्रस्तावना

मध्ययुगीन महाराष्ट्रात बलुता पध्दतीचा एक अविभाज्य घटक या नात्याने महार वतनाकडे पाहिले जात असे. प्रामुख्याने ‘वतन’ आणि ‘इनाम’ या संज्ञा अनेकवेळा स्वैरपणे वापरल्या जातात. सर्वप्रथम इतिहासाच्या दृष्टिकोनातून त्यांचा अर्थ समजावून घेतला पाहिजे. वतन आणि इनाम हे शब्द एखाद्या व्यक्तीला सरकारने प्रामुख्याने जमीनीच्या रूपाने, त्याच्या कार्याचा मोबदला म्हणून दिलेल्या जमीनीच्या संदर्भात वापरले जातात.एकाच व्यक्तीला या दोन्ही प्रकारची देणगी मिळू शकते, परंतू ती देण्याची कारणे भिन्न असतात. इतिहासाच्या संदर्भात ‘वतन’ ही संज्ञा एखाद्या गावाच्या कायमच्या रहिवाशाला त्याने ग्रामसेवा करावी, या उद्देशाने त्याच्या घराण्याला सरकारी सारा माफ, जमीन वंशपरंपरा एका सरकारी सनदेच्या द्वारे बहाल करते तेव्हा त्या देणगीला ‘वतन’ असे म्हणतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या ‘महार वतन’ विषयी आपले वेगळे विचार मांडले आहेत. त्यांच्या मते समाजाच्या उन्नतीसाठी महार वतन हे अडथळा ठरत आहे म्हणून हे वतन खालसा झाले पाहिजे, असे त्यांचे मत होते. म्हणून प्रस्तूत शोध निबंधात डॉ. आंबेडकरांचे काय विचार होते व त्यामध्ये त्यांनी कोणत्या सुधारणा सुचविल्या याबद्दलची चर्चा करणार आहे.

## वतन म्हणजे काय ?

‘वतन’ हा अरबी शब्द असून त्याचा अर्थ आपला देश, आपली जमीन असा आहे. इस्लामी राजवटीत हा शब्द मराठीत रूढ झाला. सरकारकडून गावच्या अधिका-याला अथवा सेवकाला त्याच्या चाकरीच्या मोबदल्यात जी जमीनीची देणगी मिळे तिला ‘वतन’ हि संज्ञा प्राप्त झाली.

१८७४ च्या वतन ॲक्ट मध्ये, ‘‘कोणतीही वतनी मालमिहकत असल्यास ती व वंशपरंपरेचा हुद्दा व त्यासंबंधी हक्क व अधिकार ही मिळून वतन होते.’’ अशी वतन शब्दाची व्याख्या करण्यात आलेली आहे. या व्याख्येवरून वतन या शब्दामध्ये दोन गोष्टीचा समावेश होतो. १. वंशपरंपरेचा हुद्दा व २. वतनी मालमिळकत.[१]

## ब्रिटिश कालीन वतन पद्धती

ब्रिटिशानी आपल्या काळात बेसुमार वाढलेल्या वतन पद्धतीत काटछाट करण्याचा प्रयत्न केला व त्याप्रमाणे त्यांनी अलुत्या - बलुत्यांचे तीन वर्गात विभाजन केले.

१. सरकार आवश्यक वतनी गांव कामगार
२. रयत आवश्यक वतनी गांव कामगार
३. सरकार व रयत यास अनावश्यक असे वतनी गांव कामगार.[२]

यापैकी दुस-या आणि तिस-या वर्गातील वतनदार जे सरकारला आवश्यक नाहित अशांच्या इनामावर कर बसवून लोकोपयोगी कामाच्या तगाद्यापासून जरी नसले तरी सरकारी नोकरीच्या तगाद्यापासून त्यांना मुक्त करण्यात आले. त्यामुळे त्यांची स्थिती आणि गावातील रयतेची स्थिती सारखीच झाली व त्यामुळे त्यांना वतन ॲक्ट लागू करण्यात आलेला

नाही. वतन ॲक्ट हा काय तो पहिल्या वर्गाच्या गांव कामगारांना लागू करण्यात आलेला आहे. कारण जे गांव कामगार सरकारी कारभार चालविण्यास आवश्यक आहेत. या नव्या व्यवस्थेमुळे पूर्वीचे बारा बलुते लयास जावून या कायद्यानुसार गावकामगार म्हणजे पाटील, कुलकर्णी, महार असे तीन असून चौथा जागल्या हा होता.

### महारांच्या कामाची निश्चिती नव्हती

२ सप्टेंबर १९२७ च्या बहिष्कृत भारत या अंकात १८७४ च्या वतन कायद्यातील तरतूदीविषयी डॉ. आंबेडकरांचा आक्षेप होता. त्यांच्या मते महारांच्या सेवा नेमकेपणाने विशद केलेल्या नव्हत्या. या कायद्यातील लवचिकता मुद्दामहूनच ठेवण्यात आली होती कारण त्यांच्याकडून शक्य तेवढी सर्व कामे करून घेता यावी. उदा. जमीन महसूल गोळा करणे, सरकारी टपाल पोहच करणे, गावातील जन्म - मृत्यूच्या नोंदी ठेवणे, इ. कायद्यानुसार गावाच्या लोकसंख्येनुसार त्या गावची नक्की किती महारांची सेवा आवश्यक आहे, हे ठरविले असूनही हा नियम धाब्यावर बसवून गरजेपेक्षा किती तरी अधिक महारांना अधिकारी बळजबरीने कामाला जुंपत. त्यांच्या कामाच्या वेळा अनिर्बंध तर होत्याच शिवाय ज्याला काम सोपविलेले असे ती व्यक्ती काही कारणाने असमर्थ असेल तर त्याच्या पत्नीवर, मुला - मुलीवर, वृद्ध माता - पित्यावर काम करण्याची सक्ती केली जात असे.

या सरकारी सेवांखेरीज महारांना बलुता देणा-या रयतेची व शेतक-यांचीही सेवा करावी लागे. उदा. सुगीसाठी जमीन तयार करणे,मालकाकडे कुणाचा मृत्यू झाल्यास चितेसाठी लाकडे गोळा करणे, रस्त्यात मेलेले प्राणी उचलून त्याची विल्हेवाट लावणे, इ. किरकोळ कामे करावी लागत.

महाराची जशी कामे निश्चित नव्हती तशीच माणसे किती राबवायची हेही निश्चित नव्हते.तसेच कामाचे तासही निश्चित नव्हते. महार म्हटला की तो दोन घरचा चाकर असे. या बाबतीत महाराची मर्जी असो वा नसो याचा विचार केला जात नसे. त्याचा पाहिजे तसा वापर केला जात असे. माणूस म्हणून जगण्याचा अधिकार हिरावून घेण्यात आला होता.डॉ. आबेडकरांचा महारांना दिल्या जाणा-या वागणूकीला विरोध होता. म्हणून वतन खालसा करावे असा त्यांचा विचार होता. या पद्धतीमध्ये अनेक प्रकारचे दोष होते ते दूर करण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी प्रयत्न केले.[३]

१६ सप्टेंबर १९२७ च्या बहिष्कृत भारत या अंकांत महारांना दिल्या जाणा-या मुशाहि-याबद्दल व महार वतन खालसा करावे याबद्दल डॉ. आंबेडकरांनी आपले विचार मांडले आहेत. महारकीच्या कामाकरिता महारांना साधारणपणे तीन प्रकारचे उत्पन्न असते. १. इनाम जमीन २. बलूते ३. नक्त पगार हे मुशाहिराचे तीन प्रकार सर्वत्र आढळतात असे नाही. त्यांना ठराविक उत्पन्न देवून स्थैर्याची हमी देवू शकत नव्हती. म्हणूनच महार वतन रद्द करण्यासाठी अर्ज करण्यात आला होता.त्याच्या अस्तित्वाने महारांचे कुटुंबीय अत्यंत दुय्यम, महत्वाकांक्षाहिन व स्वाभिमानशून्य जीवन जगत होते. त्यांच्या रसातळाला जाण्यास, कोणतीही सुधारणा वा प्रगती न होण्यास वतनासारखी दुष्ट व्यवस्था कुटुंबात प्रचलित असणे हे प्रमुख होते. या वतनामुळे महारातील महत्वाकांक्षा साफ मारली गेली आहे. वतन गेल्याशिवाय महारांची सुधारणा होणे शक्य नाही.असे डॉ. आंबेडकरांचे मत होते.

३० सप्टेंबर १९२७ च्या अंकात वतन रद्द करण्याचे उपाय व मार्ग यावर विचार केला आहे. सरकार व महार समाज या दोन्ही पक्षानी तडजोड करून कसे बदल घडवून आणावेत ते ठरवावे, असे खुद्द १८७४ च्या वतन कायद्यात नमूद केले आहे.[४] बलूता व रोख रक्कम मोबदला म्हणून देणे हे एकदमच थांबवावे, परंतू वतनाशी निगडीत जमीन त्यांच्याकडून हिरावून घेतली जाउ नये. सरकारने निश्चित केलेली रक्कम भरल्यावर जमीनीचे मालकी हक्क त्यांच्याकडे सुपूर्त करण्यात यावे, असे विचार डॉ. आंबेडकरांनी मांडले. त्याचबरोबर त्यांनी १८७४ च्या वतन कायद्यात काही बदल सुचविणारा मसुदा तयार केला[५].

४ नोव्हेंबर १९२७ रोजीच्या अंकात १८७४ च्या वतन कायद्यातील बदल सुचविणा-या मसुद्याची विस्तृतपणे चर्चा या लेखात करण्यात आली आहे. डॉ. आंबेडकरांच्या मते महार वतन खालसा करावे म्हणजे इनामातून कमी करून रयताव्यात दाखल करावे व महाराना नोकरीतून सोडवावे. हाच त्या मसुद्याचा मुख्य हेतू होता. या मसुद्याच्या मुळाशी सहा हेतू होते.[६]

१. महार लोक आज गावकीचे काम करीत आहेत परंतू ज्यांच्या जमिनी परघराण्यात गेल्या असतील त्या त्यांच्या त्यांना मिळून त्यांच्या पोटापाण्याची सोय चांगल्या प्रकारे व्हावी.
२. आजकाल महारांना जे बलुते मिळते ते मिळणे न मिळणे सर्वस्वी रयतेच्या मर्जीवर अवलंबून ठेवलेले आहे. तरीही सरकारची व रयतेची कामे करुनही बलूत्यासाठी महारांना रयतेच्या तोंडाकडे पहावे लागत होते. दिले तर घ्यावे, नाही तर जावे याशिवाय महारांना बलूते वसूल करण्यास दुसरा पर्याय नाही ही परिस्थिती जावून महारांच्या बलूत्याची वसूली योग्य रितीने होवून त्यांच्या बलूत्याचा हक्क पूर्णपणे प्राप्त व्हावा हा आमचा हेतू आहे.

३. कामाचा बोजा वाढला किंवा महागाई झाली तर कामदार लोकांच्या पगारात वेळोवेळी बढती करण्याचा नियम सर्वत्र लागू आहे. परंतू महारांना दिलेले बलूते एकदा जे काही ठरवून दिले त्यात मात्र फेरबदल होत नाही. ही वाढ वेळोवेळी व्हावी.
४. काही ठिकाणी महार लोक फक्त सरकारी कामे करण्यास तयार असतात. रयतेचे काम करण्यास नाखुश असतात. परंतू रयतेच्या व सरकारच्या कामाची एकत्र सांगड घातली गेली असल्यामुळे महारांना दोघांचेही काम करावे लागत असे
५. ज्याप्रमाणे काही महार लोक रयतेच्या कामाला कंटाळले आहेत तसेच काही महार लोक सरकारी कामालाही कंटाळले आहेत. अशा लोकांना त्यांच्या हितसंबंधास धोका न होता त्यांना सरकारी कामाचा राजीनामा देता यावा.
६. सर्वत्र महार गावकामगाराची अशी तक्रार आहे की, महारांची कामे निश्चित नाहित. वाटेल तो अधिकारी वाटेल ती कामे सांगतो ती महारांना करणे भाग पडते. या जुलूमाला आळा बसून महार लोकांनी करावयाची कामे निश्चित करावीत.[७]

डॉ. आंबेडकरांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांना काहीनी विरोध केला. त्यांनी अज्ञानी महारांचा गैरसमज करून दिला. डॉ. आंबेडकरांच्या विरोधात या लोकांना उठवून बसविले. ज्यांचे वतनाशी काडीमात्र संबंध नव्हता. त्यांनी या लोकात गैरसमज निर्माण केला.[८]

## कोल्हापूर संस्थानातील महार वतन खालसा

या महार वतना विषयी डॉ. आंबेडकर यांनी छ. शाहू महाराजांचा आदर्श डोळयासमोर ठेवून महार वतन खालसा करण्यासाठी सरकारमध्ये प्रयत्न केले. छ. शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात जून १९१८ मध्ये कुलकर्णी वतन व सप्टेंबर १९१८ मध्ये महार वतन रद्दबातल केले व हिंदू समाजाने महारावर लादलेल्या गुलामगिरीतून त्यांना मुक्त केले[९]. गावच्या अधिका-यासाठी काही सेवा विनामूल्य पुरविण्याची बळजबरी महारावर होवू नये, यासाठी त्यांनी आदेश दिला. त्यांनी केवळ बंधनातून मुक्तच केले नाहीतर इतर समाज उपभोगीत असलेले सर्व मानवी हक्क त्यांना बहाल केले. त्यांनी असेही म्हटले की, राज्याच्या प्रशासकीय सेवांमध्ये महारांना पदोन्नतीस कोणतीही बाधा येवू नये. अखेर १८ सप्टेंबर १९१८ मध्ये सरकारी आदेश काढून 'महार वतन' खालसा केले व गावच्या सेवा बदल्यात त्यांच्या ताब्यात असलेल्या जमीनीच्या तुकडयांचे मालकी हक्क त्यांना बहाल केले. अशा प्रकारे महार हे गुलामगिरीमुक्त झाले व ही सुधारणा अमलात आणणारे कोल्हापूर हे पहिले संस्थान ठरले[१०].

डॉ. आंबेडकरांनी सुचविलेल्या दुरुस्त्यास अनेकांच्या वेगवेगळया प्रतिक्रिया देण्यात आल्या काहींनी याला चांगला प्रतिसाद दिला तर काहीनी त्यास विरोध केला. अखेर डॉ. आंबेडकर व इतरांच्या सातत्यपूर्ण व अथक परिश्रमाची फलनिष्पत्ती होउन महार वतनाची ही मध्ययुगीन संस्था स्वातंत्रोत्तर काळात सन १९५९ मधील संसदीय कायद्याने रद्दबातल करण्यात आली.

## सारांश :

मध्ययुगीन काळात सुरु झालेली ही व्यवस्था आधुनिक काळापर्यंत अस्तित्वात होती. या व्यवस्थेला धक्का देण्याचा पहिला प्रयत्न छ. शाहू महाराज यांनी कोल्हापूर संस्थानात केला. छ.शाहू महारांजाचा सामाजिक न्यायाचा वारसा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पुढे चालू ठेवला. डॉ. आंबेडकरांच्या मते महार वतन हे या समाजातील लोकांच्या प्रगतीला अडथळा ठरत आहे. समाजातील वेगवेगळया जातींना कोणता ना कोणता व्यवसाय आहे परंतू महार जातीला असा कोणताच व्यवसाय नाही. त्यामुळे त्यांना दारिद्रियात जीवन जगावे लागते आहे. म्हणून डॉ. आंबेडकरांनी आपल्या प्रयत्नाने महारांना गुलामगिरीतून बाहेर काढून आत्मसन्मानाने जगण्याची जाणीव करून दिली. महार जमातीच्या उन्नतीच्या आणि सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टिने डॉ. आंबेडकरांनी हे फार महत्वाचे काम बजावले. यामुळे दलितवर्ग खेडयातून बाहेर पडला आणि आजवर शिक्षणापासून वंचित राहिलेल्या या समाजाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाचे महत्व पटवून दिले.

## संदर्भ:

१. कुलकर्णी,अ. रा.,महाराष्ट्र समाज आणि संस्कृती,डायमंड पब्लिकेशन,पुणे २००८, पा. ६९
२. बहिष्कृत भारत, खंड २, लेख, २ सप्टें. १९२७, पा.९०
३. कित्ता, पा. ९१

४. कित्ता, लेख, १६ सप्टें. १९२७ पा. ९८
५. कित्ता, पा. ९९
६. कित्ता, लेख, ३० सप्टें. १९२७ पा. १०६.
७. कित्ता, पा. १०७.
८. कित्ता, लेख, ४ नोव्हें १९२७ पा. ११८
९. कित्ता, पा. ११९
१०.कित्ता, पा. १२०
११.कुलकर्णी,अ. रा.,महाराष्ट्र समाज आणि संस्कृती,डायमंड पब्लिकेशन,पुणे २००८, पा. ८४